June to December 2020-21

# IMR CAMPUS

**IMR Campus Newsletter Publish by** Director : **Prof.Dr.Shilpa Bendale,** Editor: **Dr. Shama Saraf,** Editorial committee: Anilkumar Marthi, Dr. Nishant Ghuge, Deepali Patil, Students Representive : Pranilshing Chaudhari, Swapnil Khadse, Saloni Patil.
**This Newsletter Publish for KCES's Institute of Management Research, Jalgaon inhouse use.**

**Institute's Vision:** Committed to provide value based, quality, professional and technical education to the students and empowering them with the reputed skillsets and competencies to face challenges of the fast changing global environment.
**Institute's Mission:** • To provide necessary technical and professional education with a view to uplifting the lives of rural and urban students. • To create conducive platform for students to develop their skills and knowledge. • To encourage innovation and research aptitude among students. • To inculcate global ethics and human values in all the learners.

## International E-Conference on" Transforming through reinventing in the current emerging global order 2020"




के.सी.ई.चे आय.एम.आर. येथे अंतरराष्ट्रीय ई कॉन्फरन्सचे यशस्वी आयोजन.

येथील केसीईज आय.एम.आर. मध्ये दि २८ ऑक्टोबर रोजी ट्रान्सफॉरमिंग थ्रू रिईंन्व्हेंशन इन द करंट इमर्जींग ग्लोबल ऑर्डर २०२० या विषयावर अंतरराष्ट्रीय ई कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले. हि कॉन्फरन्स के.सी.ई.चे आय.एम.आर. आणि ऑल इंडिया कॉन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या ई कॉन्फरन्सची प्रस्तावना करतांना आय.एम.आर.च्या डायरेक्टर प्रा.डॉ.शिल्पा बेंडाळे यांनी कोविड १९ ला संधी मानुन यशस्वी तोंड देणाऱ्या आपल्या उद्योजकांविषयी गौरवोद्गार काढले. आणि कठीण काळात उद्योगांची दिशा ठरवून ग्राहकांना दिलासा देणाऱ्या या व्यावसायिकांच्या अमूल्य योगदानाची आठवण केली.

यानंतर उपस्थित ई संशोधकांना संबोधतांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. माहुलीकर म्हणालेत नविन शैक्षणिक धोरणाची रुजवात याच कोविड – १९ काळात पक्की झाली आहे. यापुढे लिबरल आर्ट महत्वाची असेल तसेच विषय निवडीचे स्वातंत्र्य, क्लासरूम शिक्षणाऐवजी प्रत्यक्षिकांवर भर देत, कौशल्यावर आधारित शिक्षण महत्त्वाचे ठरणार आहे. पुढच्या काळात मानवी संसाधन हे सर्व प्रक्रियेत तज्ञ आणि औद्योगिक दृष्टीने विकसित असेल. या कॉन्फरन्स साठी प्रमुख पाहुण्या म्हणुन डॉ. प्रिती बजाज, व्हाईस चान्सलर – गलोनिया युनिव्हर्सिटी, यांनी सहभागी संशोधकांना संबोधित करतांना सांगितले, न्यू नॉर्मल होतांना भारतिय जुगाड सिस्टीम कशी कार्यरत झाली आणि त्यामुळे जगाची ए बी सी डी बदलली असली तरी भारतीय आपल्या उपजत बुध्दीमत्तेने कौशल्याने या परीस्थिती वर मात करुन नव्याने उभे राहात आहेत हा विश्वास डॉ. प्रिती बजाज यांनी ई उपस्थितीतांना दिला त्या पुढे म्हणाल्यात आता नोकरी गमावलेल्या लोकांना परत सामावून घेण्यावर भर दिला पाहिजे. त्यानंतर प्रमुख वक्ते – डॉ. सॅम चुन इन, डिन पी एस बी अकॅडमी, सिंगापूर आणि हेड ऑफ स्कूल ऑफ बिझनेस अॅन्ड मॅनेजमेंट यांनी ई उपस्थितांना संबोधित करतांना 'मानवासाठी मशिन्स हे वरदान आहेत पण माणसाला पर्याय नक्कीच नाही हे आता कोविड परिस्थितीने सिद्धच केले आहे. नविन नोकरीच्या संधी तीन विभागात असतिल त्यात प्रामुख्याने सर्विस सेक्टर, क्रिएटिव्ह सेक्टर आणि व्हाईट कॉलर रुटीन जॉब असुन बदलांना सामोरे जातांना त्यांनी घोडेस्वारी कडुन ऑटोमोबाईल कडे आलेल्या जगाचे आणि घोडेस्वारी नंतर ड्रायव्हर झालेल्या माणसांची चपखल उदाहरणे दिलीत'. यानंतर डॉ. मारीका सेत्पाला, डिन फॅकल्टी इंजिनियरिंग, साताकुंटा युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्स, फिनलॅन्ड, ह्यांनी या अंतरराष्ट्रीय कॉन्फरन्सला संबोधित करतांना फिनलॅन्डच्या शैक्षणिक बदलांची माहिती दिली आणि जागतिक स्तरावर आय क्यू कडून ई क्यू कडे जाणारे बदल अधोरेखित केले.

कोविडच्या बदलत्या परिस्थितीचा विचार करुन, समोर दिसणारी आव्हाने लक्षात घेऊन अश्या प्रकारची कॉन्फरन्स पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली होती. अंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या विविध भागातून तज्ञ संशोधकांचे संशोधन यानिमित्ताने ईथे उपलब्ध झाले. ८० संशोधकांनी आपले संशोधन पेपर या कॉन्फरन्समध्ये सादर केले आहेत. दोन विभागात हे पेपर विभागले गेले होते. त्यात टेक्निकल सेशन आणि जनरल मॅनेजमेंट हे विभाग होते. यासाठी सेशन प्रमुख म्हणुन डॉ. मोहन अग्रवाल, प्रा. पारुल अग्रवाल प्रेसिडेंट, इंडोगल्फ मार्केटिंग असो. दुबई यांचे विषेश मार्गदर्शन संशोधकांना लाभले. विविध महत्त्वपूर्ण संस्थामधील अधिकारी, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, आय.एम.आर.चे माजी विद्यार्थी बहुसंख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## वेबिनार – नव्या पिढीची वाचन संस्कृती



के.सी.ई.चे आय.एम.आर. मध्ये वाचक प्रेरणा दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील बेविनार – केसीई इन्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च इन्स्टिटट्यूट, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि व वा वाचनालय जळगाव यांनी – नव्या पिढीची वाचन संस्कृती – या विषयावरील वेबिनारचं आयोजन सुरुवातीला प्रा.डॉ.शुभदा कुलकर्णी यांनी उद्घाटक प्रा.नरेंद्र पाठक तसेच कीनोट स्पिकर आणि महाराष्ट्रातील बेस्ट सेलर लेखिका दिपा देशमुख आणि कवी उत्पल व बा, विद्यापिठ निरंतर शिक्षण विभागाचे प्रा. डॉ. मनिष जोशी, व वा वाचनालयाचे सन्माननीय सदस्य आणि आय.एम.आर.च्या डायरेक्टर प्रा. डॉ. शिल्पा बेंडाळे यांचे स्वागत केले, आणि वाचन प्रेरणा दिनाचं औचित्य साधत एपीजे अब्दुल कलाम यांना विनम्र अभिवादन करत त्यांच्या काही स्मृती जागवल्या. त्यानंतर वेबीनारच्या समन्वयक डॉ. शमा सराफ यांनी या राष्ट्रीय वेबीनार मागील भुमिका विषद केली. त्यांनंतर बोलतांना कीनोट स्पिकर दीपा देशमुख म्हणाल्यात, पुस्तकं स्वत:च सांगतात कुठलं चांगलं आणि कुठलं नाही. वाचताना भाषेचा अडळा येत नाही, सुयोग्य प्रयत्न केला तर आपल्या मातृभाषेशिवाय इतरही भाषा आपल्या जिवलग बनतात. आजची पिढी, तरुणाई – नक्की वाचते . मराठी वाचते, इंग्रजी वाचते, ते अनुवाद सुध्दा वाचतात ...फक्त त्यांची वाचण्याची माध्यमं शहरांनुसार बदलली आहेत. तंत्रज्ञानाद्वारे इंटरनेट, स्मार्ट फोन्स, संगणक हे सारं निवडक शहरांपुरतं आणि सुस्थितीतल्या लोकांजवळ असण्यापुरतं मर्यादित न राहता ते तळागाळापर्यंत पोहोचलं पाहिजे. मग गावातले लोकही किंडलवर पुस्तकं वाचू शकतील. सोशल मिडियावर अत्यंत सकस आणि सशक्त लिहिणारी तरुण मंडळींची एक मोठी जंत्रीच वाचकांना दिपा देशमुख यांनी सांगितली. आहेत. कला आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यावर लिहिताना हे लोक अतिशय सजगतेनं लिहितात. आज कोरोनानं आपल्याला नवं तंत्रज्ञान आत्मसात करा, त्याचा वापर करा, नाहीतर फेकले जाल याचा जणू इशाराच दिला आहे. त्यामुळे आधी साधनांची उपलब्धता करणं हे पायाभूत काम करावं लागणार आहे. त्यासाठी जबाबदारी घेऊन गावागावात, शहराशहरात सजग, सुजाण नागरिकांनी एकत्रित येऊन प्रयत्न करायला हवेत, असे दिपा देशमुख म्हणाल्यात.

कवी उत्पल यांनी बोलताना ते स्वतः एक इंजिनियर असतांना कसे साहित्यक्षेत्राकडे वळला याची कहाणी थोडक्यात सांगितली. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळे लेखक/कवी भेटतात, ते वेगवेगळ्या विषयांवरची आपली गोडी वाढवतात, पण आपण तिथेच न थांबता पुढे पुढे जात राहिलं पाहिजे. विशेषत: त्यानं वाचनाबरोबरच दृकश्राव्य माध्यमांचा वापर किती समर्पणे करता येतो हे उत्पलने सांगितलं. चित्रपट माध्यम आपल्या पुस्तकांना पुरक कसे ठरते हेही उत्पल यांनी सांगितले. पुढे ते म्हणालेत, या सगळ्यांत मूळ कंटेंट ताकदवान असेल तर सगळंच पुढलं चांगलं होतं. दृकश्राव्ये माध्यम आपल्याला पॅसिव्हं बनवतात, तर प्रत्यक्ष वाचन आपल्याला ॲक्टिव्ह बनवतं. उत्पल पुढे म्हणालेत की पुस्तकं केवळ वाचण्यासाठी नसतात, तर ती आपल्यामध्ये काय बदल घडतोय याच्या प्रतीक्षेत असतात आणि तो बदल घडवून आपण या पुस्तकांचं ऋण फेडायला हवं. या वेबीनार मध्ये ३०० वाचकांनी भारतभरातून सहभाग नोंदवला. गोवा, मध्यप्रदेश, कोल्हापूर ते नागपुर विविध शहरातील वाचक सहभागी झाले होते.

# Various Videos prepared by our students in the pandemic period of Lock-down (Covid-19) for the Online MASSAGE of Social Security-Safety with Angle of Social awareness.




## KCES'S IMR - ONLINE PATRIOTIC SONG COMPETITION FOR IMR STUDENTS AND ALUMNI: 2020



**IMR STUDENTS**
Result as follow -
First Prize: Saakshi Anil Wani, IMBA,
Second Prize: Akash Sanjay Sonwane, MBA
Third Prize: Sanjana Ingale, IMCA,

**IMRALUMNI:**
**Patriotic song competition 2020:**
Result as follow-
First Prize: Omprakash Jiwani (Batch: 2014-16)
Second Prize: Prachi Bhatiya, Baroda, Gujrat (Batch :2010-2012)



## आंतरराष्ट्रीय योगा दिन निमित्त ऑनलाईन वेबीनार



खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने पोस्ट कोविड युगातील 'ताण तणाव व्यवस्थापन आणि एक आरोग्यसंपन्न जिवन पध्दती' या विषयावर वेब फॅकल्टी डेव्हलपमेंट वेबीनार. येथील आय.एम.आर मध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी अंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने आय.एम.आर.च्या डायरेक्टर प्रा डॉ. शिल्पा बेंडाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक ऑनलाईन योग सेमिनार आयोजित करण्यात आले होते. योगतज्ज्ञ स्वप्नील काटे यांनी मार्गदर्शन केले.

## Webinar on "Delighted Minds

learning for professionals "was organised for our students on 6th June 2020. Our Alumni Mr. Nandan Pradhan, Executive director of MCON Rasayan Pvt Ltd. conducted the session.



## Webinar on "Awareness of Capital Market"

was organized by KCES's IMR, Jalgaon in association with Bombay Stock Exchange on 5th January 2021. Dr.Sharankumar Shetty, Associate Professor, guided the students on different facets of capital market.

## A workshop on Rural Entrepreneurship

was organised on 10/10/2020 by the Rural Entrepreneurship Development Cell of our Institute formed under Mahatma Gandhi National Council of Rural Education (MGNCRE), Department of Higher Education, Ministry of Human Resource Development, Government of IndiaDr. Mahesh Chopade, Nagpur conducted the workshop

## "A Webinar On Survival to Revival"



Was organised for our Students on 26 May 2020. Our Alumni Mr. Anand Dubay, Director Marketing and Strategy for Asia pacific region, Alves group of Companies conducted the Session.

## webinar on Commodity Derivatives Markets




A live **webinar on Commodity Derivatives Markets** was organised in association with NCDEX Institute of Commodity markets and Research (NICR) on 12th September 2020. The following eminent personalities guided in the webinar
1) Mr. Aleen Mukherjee - COO NICR 2) Mr. Niraj Shukla - AVP, NICR 3) Mr. Ram Gopal Yadav - Dy. Mgr. NICR 4) Ms. Anuradha Singh, Sr. Associate, NICR Total 108 students attended the webinar

## के.सी.ई.चे आय.एम.आर. मध्ये स्टार्ट अप आणि इंटेलेक्चुअल प्रॉप्रर्टी राईट याविषयी कार्यशाळा

दि २ नोव्हेंबर २०२० रोजी के सी ई चे आय एम आर मध्ये कनाड लॅब, पुणेचे फाऊंडर अॅन्ड सिईओ अभिजित भांड, यांचे स्टार्ट अप आणि इंटेलेक्चुअल प्रॉप्रर्टी राईट याविषयी कार्यशाळा झाली. याप्रसंगी आय एम आर च्या रिसर्च आणि एनोव्हेशन सेंटर अंतर्गत विद्यार्थी इनोव्हेशन सेल चे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या कल्पकतेने नवीन व्यवसायिक संकल्पना पुढे आणण्यासाठी हा सेल सूरु करण्यात आला आहे. के सी ई चे आय एम आर च्या डायरेक्टर प्रा डॉ शिल्पा बेंडाळे याप्रसंगी बोलताना म्हणाल्या हि संकल्पना आमची इन्टीट्यूट नॅशनल इनोव्हेशन आणि स्टार्ट अप पॉलिसी या सेन्ट्रल गव्हर्न्मेंट च्या शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात येत आहे. त्याचीच सुरवात अभिजीत भांड यासारख्या तरुण कल्पक व्यावसायिकाच्या मार्गदर्शनाखाली करीत आहोत. कनाड लॅब तर्फे पेटंट, ट्रेडमार्क कॉपी राईट रजिस्ट्रेशन,आणि ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित करीत असते. याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे अभिजित यांनी अनेक आय टी उद्योग आणि स्टार्ट अप उद्योगाचे उदाहरणे देऊन संकल्पना स्पष्ट केली.

कनाड लॅबचे लीगल एक्सपर्ट आणि winner of South Asian Youth Leadership ward given by SRC. की नोट स्पिकर अभिजित भांड यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, परंपरागत व्यवसाय आणि स्टार्ट अप या दोन वेगवगळ्या गोष्टी आहेत. एकदम नवीन प्रॉडक्ट किंवा सर्व्हिस देण्याचे माध्यम नवीन असल्यास त्याला आपण स्टार्ट अप म्हणू शकतो. जसे अमेझॉन वर परंपरागत व्यवसायामुळे निर्माण होणाऱ्या वस्तूच मिळतात परंतु त्याचे वस्तू दाखवण्याचे आणि घरपोच पोहोचवण्याचे तंत्र परंपरागत पद्धती पेक्षा वेगळे आहे. असे काही आगळे वेगळे लोकोपयोगी, समाजाभिमुख प्रयोगाचे रूपांतर नावीन्यपूर्ण व्यवसायात आजच्या तरुण मंडळींना सहज करता येऊ शकते. आपल्या कल्पकतेला तुम्ही पेटंट रजिस्टर करून सुरक्षित करू शकता.

स्टार्टअप सुरू करण्यासाठी काही नियम आहेत. जसे की असा व्यवसाय ५ वर्षेच्या आतील असावा, त्याची वार्षिक उलाढाल २५ कोटी च्या आत असावी. आणि मुख्य म्हणजे त्याला डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रिअल पॉलिसी अँड प्रमोशनची मान्यता असल्यासच उत्तम. अशा नवीन संकल्पनेवर आधारित स्टार्टअप मुळे स्वतः ची ओळख तर निर्माण होतेच त्याच बरोबर पैसा आणि प्रसिद्धी सोबतच काहीतरी नावीन्यपूर्ण निर्माण करण्याची ऊर्मी आणि जिद्द जागृत होते. कार्यक्रमाचे प्रस्तावना आणि पाहुण्यांची ओळख, रिसर्च आणि इनोव्हेशन सेंटरच्या समन्वयक डॉ वर्षा पाठक यांनी केली. पियुष पाटील आणि मोहित जाधव या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी सेल कमीटी तयार करण्यात आली.






## International Womens Day Celebration

KCES;'s IMR this year on womens day organised Chitra-Bodh Event where our student and reputed artist Miss Kadambari Chaudhari showacased her paintings and explained the meaning behind them and our another student Miss Saloni Patil who is university level weight lifting player explained her dedication and hardwork behind this weightlifting. Both of these students were felicitated by hands of our Director Prof. Shilpa Bendale.

## Placement Opportunities

A Webinar on "Placement opportunities in Dubai" was organised on 24 June 2020 by our Training and Placement cell. Mr. Shadab Memon, Entrepreneur - Al Amin tradelinks conducted the webinar. He aquainted our students on how to prepare for Jobs in Dubai. Around 312 Students Participated in this webinar.



वेबिनार • 'लॉकडाऊननंतर प्लेसमेंट्च्या संधी'वर मार्गदर्शन

विद्यार्थ्यांनी काळानुसार ज्ञान मिळवून उमेदीने सज्ज राहावे

नाशिकचे इंडस्ट्री एक्स्पर्ट दीपक ओझा यांचा सल्ला

लॉकडाऊनच्या काळात स्वतःला असे घडवा

## लॉकडाऊनच्या काळात स्टार्टअपच्या संधी... राहुल नार्वेकरांसोबत ऑनलाईन गप्पा...



करोनामुळे सर्व विद्यापीठे लॉकडाऊन, परीक्षा, शैक्षणिक वर्षाचीप्रवेश प्रक्रिया आदी अधांतरी असल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्य टांगणीला लागले आहे. कॉलेजच्या शेवटच्या वर्षात मिळणारी प्लेसमेंट नाही. अश्या अनेक चिंता विद्यार्थ्यांना सतावत आहेत. त्याच्या करीता दै. जनशक्ति आणि आय.एम.आर.च्या संयुक्त विद्यमाने खान्देशातील विद्यार्थ्यांकरीता स्टार्टअप' बाबत मार्गदर्शन करण्यासाठी द इंडीया नेटवर्क आणि स्टार्टअप स्टुडीओचे सीईओ श्री. राहुल नार्वेकर यांचा खुला ऑनलाईन इंटरव्ह्यूव घेतला आय.एम.आर.चे माजी. विद्यार्थी आणि जनशक्तीचे संपादक युवराज परदेशी यांनी.

## FDP on How to publish quality research papers



was organised on Monday 26/10/2020 by the IQAC Cell of the Institute. Dr. Kavita Suryawanshi, Head of the department, MCA Department, DY Patil Institute of Master of Computer applications and Management, Akurdi, Pune was the resource person for the FDP.

## Young Leaders




सकाळ माध्यम समूहाच्या ''यंग इंस्पिरेटर्स नेटवर्क'' Inspire Network Deliver या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन अध्यक्ष उपाध्यक्ष निवड प्रक्रिया पार पडली. आय.एम.आर. महाविद्यालय जळगाव अध्यक्षपदी प्रणील चौधरी, उपाध्यक्ष पदी स्वप्निल खडसे तर युवती अध्यक्ष म्हणून सलोनी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळेस डायरेक्टर डॉ. शिल्पा बेंडाळे नवनिर्वाचित सभासदांना अभिनंदन करताना.

**MBA Course Vision:**

“To become a preferred Institute in the field of Management, to enhance value based education among the young aspirants”.

**MBA Course Mission:**

- To develop the rural and urban students to be professionally competent.
- To inculcate values across all learning activities.
- To provide opportunities to showcase analytical skills and innovative thinking.
- To keep abreast students with changing global economy

**MBA Program Educational Objectives (PEO’s)**

| PEO | PEO Statements |
|---|---|
| PEO-1 | Practice the management theories and concepts. |
| PEO-2 | Acquire skills to handle decision making for achieving organizational goals |
| PEO-3 | Imbibe values and ethics in the individual for organizational conduct. |
| PEO-4 | To develop leadership qualities & handle Managerial Environment |